# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १८४२/२०२१

**तक्रारकर्ता,** श्रीम. गौतमी वामन आखाडे,
मारवाडी चाळ सिध्दार्थ नगर,
मॉडर्न दुकानासमोर परशुरामवाडी
गेट समोर, रुम नं. २, कोळसेवाडी,
कल्याण पूर्व, जि.ठाणे ४२१ ३०६.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद
ठाणे, बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे
जि.ठाणे ४००६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद
ठाणे बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे
जि.ठाणे ४००६०१.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
ज्ञानमंदिर हायस्कूल, कल्याण पूर्व, ता.कल्याण,
जि.ठाणे ४२१३०६.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, ज्ञानमंदिर हायस्कूल, कल्याण पूर्व,
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१३०६.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १३/१०/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ६/९/२०२१ | ---- | १९/१०/२०२१ | १०/११/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२६/११/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती साधना अबूलै, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, ज्ञानमंदिर हायस्कूल कल्याण अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राहूल भालेराव, मुख्याध्यापक, ज्ञानमंदिर हायस्कूल कल्याण उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *ज्ञानमंदिर हायस्कूल कल्याण पूर्व या शाळेतील २०१४ मधील तत्कालीन मुख्याध्यापक सौ.साधना प्रमोद अंबुर्ले यांची शासन मान्यता प्रवर्गासह असलेली छायांकित सत्यप्रत मिळावी व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१०/११/२०२१ रोजी, " *जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग २, जि.प.ठाणे यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहितीतील मुद्दा क्र.१ व २ ची माहितीबाबत कार्यालयातील अभिलेख पुनश्च तपासून तसेच जन माहिती*

*अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानमंदिर हायस्कूल, कल्याण पूर्व यांच्याकडून प्राप्त करून घेवुन अपिलार्थीस १५ दिवसात नि:शुल्क उपलब्ध करून दयावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या पदास दिलेल्या मान्यतेची प्रत दिलेली आहे. तथापि मुद्दा क्र.२ व्दारे मागणी केलेली माहिती दिलेली नाही. आजच्या सुनावणीस ज्ञानमंदिर हायस्कूल मुख्याध्यापक उपस्थित आहेत. तथापि तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे माहिती अर्ज दिलेला आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांना व्यक्तिश: उपस्थित राहणेची नोटीस काढण्यात यावी.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग २, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी पुढील सुनावणीस व्यक्तिश: उपस्थित रहावे. आयोग कार्यालयाने त्यांना सुनावणीची सूचना काढावी.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग २, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे **- यांना प्रत** ---- शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे, जि.ठाणे ४००६०१. **यांचेमार्फत रवाना.** (शिक्षणाधिकारी यांनी सदरची प्रत तात्काळ तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास पोस्टाने सादर करावी.)